**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १९९/२०२५ मधील नि. ३०७ वरील आदेश</u>**

*<u>(लक्ष्मण रभाजी वाघ विरुद्ध रंगनाथ रभाजी वाघ व इतर)</u>*

वादींनी प्रस्तूतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ३ यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्यास म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ करुन मिळावा याकरीता अर्ज दाखल केला आहे.

**०२.** वादींनी प्रस्तूत अर्जान्वये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीच्या मुळ दाव्यास दि. १७/०४/२०१८ रोजी कैफियत देवून प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यास वादीने दि. २५/०९/२०१८ रोजी अर्ज दाखल करुन हरकत घेतली व सदर अर्ज निकाली झाला. नंतर वादीने प्रतिदाव्यास म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने व त्याकाळात वादीची तब्बेत वृध्दापकाळाने बरी नसल्याने वादीस विलंब झालेला आहे. तरी वादीचे म्हणणे दाखल करण्यासाठी झालेला उशीर माफ करुन वादीस म्हणणे देण्याची परवानगी मिळण्याची विनंती वादीने केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. ३ चे वारसांनी प्रस्तूत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व त्यांनी वादी यांच्या अर्जातील कथनांचा आक्षेप घेऊन असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांनी दि. १७/१०/२०१८ रोजी प्रतिदावा दाखल केला आहे. त्यानंतर वादीने म्हणणे देणेकामी कोणताही अर्ज केलेला नाही. त्यानंतर पाच महिन्यांनी वादीने प्रतिदाव्यास आव्हान देवून अर्ज केला, परंतु सदरचा अर्ज नामंजुर झाला. त्यामुळे वादीस म्हणणे देणेकामी विलंब झाला आहे. तरी वादीचा अर्जावर जास्तीत जास्त दंड करावा, अशी विनंती त्यांनी केली.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. वादीने विहीत मुदतीमध्ये प्रतिवादी क्र. ३ चे प्रतिदाव्यास म्हणणे दाखल करणे आवश्यक होते परंतू वादी हा वयस्कर असल्याने व त्याची तब्बेत बरी नसल्याने वादीचा प्रतिदाव्यास हरकत घेण्यासाठी अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. ३ चा प्रतिदावा हा वादीचे म्हणणे न घेता चालविणे उचीत होणार नाही. सबब, वादी यांना झालेला विलंब रुपये २००/– खर्च देवुन माफ करण्यात येतो. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतोः–

## <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.३०७) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी तालुका विधी सेवा समिती संगमनेर यांना खर्च रु.१००/– द्यावा.

३. वादीस प्रतिवादी क्र. ३ चे प्रतिदाव्यास म्हणणे देणेकामी परवानगी देण्यात येते.

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.06.17 12:00:19 +0530

संगमनेर

दि. १६/०६/२०२५.

(श्रीमती एस. बी. ढवळे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
संगमनेर.